ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

ENGLISH / MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

158

## EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka.
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S, Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology.
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof, P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli


159

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj ★

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | प्राथमिक शिक्षण : समस्या आणि उपाय<br>**विजय लिंबाजीराव कोल्हे** | ६७-७३ |
| १३ | ग्रामीण कवितेचा नवा आयाम : 'जहर खाऊ नका'<br>**मनिषा नामदेवराव दिघडे** | ७४-७८ |
| १४ | मराठवाड्यातील इयत्ता १२वी कला शाखेतील विद्यार्थ्यांची बुध्दीमत्ता आणि शैक्षणिक संपादनुक अभ्यासणे आणि तुलनात्मक अभ्यास करणे<br>**रेखा पुंजाराम बोर्डे** | ७९-८२ |
| १५ | मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महाराणी ताराबाईचे योगदान<br>**Annie Sumant Nalla** | ८३-८६ |
| १६ | डेक्कन एज्युकेशन सोसायटी द्वारे स्वातंत्र्या नंतर (सन १९४७ नंतर) दित्या जाणाऱ्या क्रीडा सुविधा<br>**श्री. गौतम सोनवणे**<br>**डॉ. सुदाम शेळके** | ८७-९२ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार आणि कार्ये<br>**जॉकी पीटर घुले** | ९३-९९ |
| १८ | भारतीय आदिवासींच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. साईनाथ शेटोड** | १००-१०३ |
| १९ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीशिक्षणातील योगदान-एक अभ्यास<br>**वर्षा सुदाम त्रिभुवन** | १०४-१०७ |
| २० | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ५+३+३+४ आकृतीबंधाचा एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. रेखा पाठक** | १०८-११३ |
| २१ | दलित कवयित्रींच्या कवितेतील मुक्तछंद प्रतिमासृष्टी आणि मिथके<br>**डॉ. छाया हरिभाऊ कदम-पवार** | ११४-१२० |
| २२ | कोविड-१९ चे असंगटीत क्षेत्रातील रोजगारावरील परिणाम<br>**प्रा. निहार अ. बोदेले** | १२१-१२६ |




Adarsh Arts & Commerce College, Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २२. कोविड-१९ चे असंगटीत क्षेत्रातील रोजगारावरील परिणाम

प्रा. विहार अ. बोदेले
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली.

सारांश

जगातील १८५ पेक्षा जास्त देश कोविड १९ महामारीने प्रभावित झालेले आहेत. भारतात सुध्दा कोविड १९ महामारीचा अनेक क्षेत्र क्षेत्रावर प्रभाव दिसुन येतो. परंतू सर्वात जास्त ज्या क्षेत्रावर आर्थिक संकट निर्माण झाले आहे तो क्षेत्र म्हणजे देशातील असंगटीत क्षेत्र होय. देशातील असंगटीत क्षेत्र जो एकूण अर्थव्यवस्थेच्या ९३ टक्के रोजगार उपलब्ध करून देता या क्षेत्रावर अतिशय गंभिर दुषपरिणाम झाल्याचे दिसुन येते. कोरोना प्रतिबंधक उपाय म्हणून लावलेल्या लॉकडाउनमूळे देशातील जवळजवळ १२ कारोड लोकांनी आपला रोजगार गमावला आहे. त्यापैकी असंगटीत क्षेत्रातील ९ करोड श्रमिक बेरोजगार झाले. कोरोना काळात असंगटीत सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील मोठया प्रमाणात रोजगार घटले शिवाय या क्षेत्रातील अनेक सुक्ष्म व लघू उद्योग बंद पडले. लॉकडाउन संपल्या नंतर या क्षेत्रातील अनेक व्यवसायीक व उद्योग भांडवलाच्या व श्रमिकांच्या अभावी सुरू होऊ शकले नाही. ग्रामिण भागातील असंगटीत क्षेत्रातील गैर कृषी क्षेत्रातील रोजगारावर याचा परिणाम झाल्याचे दिसुन येतो. या क्षेत्रातील लोकसंख्येला आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात अडचनी निर्माण झाल्या. एकंदरीत असंगटीत क्षेत्रातील उत्पादन घटले, श्रमिक बेरोजगार झाले, भांडवल संपले, कर्जबाजारीपना वाढला.

**बिज शब्द :** कोविड–१९, लॉकडाउन, असंगटीत क्षेत्र, बेरोजगार, श्रमिक

**प्रास्ताविक:**

कोविड १९ मुळे जगातील अनेक देश प्रभावित झाले आहेत. प्रत्येक देशातील शिक्षण, रोजगार, शेती, उद्योग, व्यापार इ. प्रत्येक क्षेत्रावर कोविड १९ च्या महामारीचे प्रभाव दिसून येत आहेत. प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे दुरगामी परिणाम पाहावयास मिळत आहेत. आंतरराष्ट्रीय श्रम संघटने नुसार जगातील २५ टक्के रोजगार कोविड मूळे प्रभावि झाले आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या डायरेक्टर जनरल नुसार कोविड १९ च्या महामारी मूळे केवळ आरोग्याचेच संकटच नव्हे तर दुरगामी आर्थिक व पेचपसंग निर्माण झाले आहे. दुसऱ्या महायुध्दामूळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटानरंतचे हे सर्वात मोटे आर्थिक संकट आहे व IMF च्या किस्टिना जार्जवा नुसार १९३०च्या जागतिक महामंदीचे जसे परिणाम अनेक देशांना व लोकांना भोगावे लागले अशी परिस्थिती या काळात लोकांनी अनुभवली. कोविड १९ महामारीमूळे संपूर्ण जगातील ४० करोडच्या वर लोकाचे रोजगार गेले असल्याचे आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अहवालवरून दिसून



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

162

येते. तसेच संपूर्ण जागात ३.३ अब्ज लोक या महामारीमूळे आर्थिक संकटात असल्याचे अनेक अहवाल व अभ्यासावरून लक्षात येते.

भारत सुध्दा या कोविड १९ च्या महामारीपासून अलिप्त राहू शकला नाही कोरोना वरील निश्चित वैद्यकीय उपाय नसल्यामूळे भारताने इतर राष्ट्रांप्रमाणे सामाजिक अंतर राखने या उपायाचा अवलंब केला व कोरोना वायरसचा प्रसार थांबविण्यासाठी संपूर्ण देशामध्ये संचार बंदी लावली. २२ मार्च २०२० पासून टप्याटप्याने चार टप्यात संचार बंदी लावली. ३१ मे २०२० पर्यंत ही संचार बंदी सुरू होती. या संचार बंदीच्या काळात जिवनावश्यक सेवा व वस्तू वगळता सर्व प्रकारचे उद्योग, व्यापार, वाहतूक, व्यवसाय या वर बंदी होती. या लॉकडाउन नंतरही अनेक राज्यात व्यापर, उद्योग, व्यवसाय, कार्यालये व वाहतूक वर वेगवगळे बंधने होती. या लॉकडाउन मूळे दैनिक मजूरी वर कार्य करणारे, अस्थायी कर्मचारी, लहान हॉटेल व्यावसायीक, हातगाड्यावर सामान विकणारे, कुटीर उद्योग, लहान उत्पादन युनीट, सेवा क्षेत्रात कार्यरत श्रमीक या सारख्या अनेक असंगटीत क्षेत्रातील लोकसंख्या या लॉकडाउन मूळे प्रभावित झाले.

देशात पहिल्या लाटेचे प्रभाव कमी झाल्यामूळे देशातील आर्थिक क्रियांना मोकळीक देण्यात आली. परंतू २०२१ वर्षाच्या सुरवाती पासून कोरोना ने परत आपले डोके वर काढले त्यामूळे अनेक राज्यात लॉकडाउन ची स्थिती कायम ठेवण्यात आली किंवा लॉकडाउन सारखे कडक नियम त्या त्या राज्यातील सरकारणे लादले. लॉकडाउन खुले जरी झाले असले तरी अनेक निर्बंधामूळे व्यापर, उद्योग, वाहतूक व सेवा क्षेत्र मोठया प्रमाणात प्रभावीत झाले हे उघडपणे समोर आले. कोरोना महामारी मूळे देशातील अर्थिक क्रिया मंदावल्या जे देशाच्या घटलेल्य जीडीपी वरून लक्षात येते. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अहवाला नूसार कोविड – १९ जवळजवळ ४० कोटी असंघटीत क्षेत्रातील श्रमिकावर घोर गरिबीची स्थिती निर्माण झाली.

भारतात बहूतांश रोजगार असंगटीत क्षेत्रात आहे. भारताच्या एकूण रोजगारापैकी ९३ टक्के रोजगार हा असंगटीत क्षेत्रातून प्राप्त होतो. भारतासारख्या विकसनशील व अधिक जनसंख्येच्या देशात कोरोना महामारीमूळे आरोग्य परिणामापेक्षा अर्थिक दुष्परिणाम अधिक आहेत. कोरोना लॉकडाउन असंगटीत क्षेत्रातील लाखो लोकांना गरिबीच्या गर्तेत नेणारे व भयावह परिणाम करणारे ठरणार आहे असे दिसून येते.

मानवाच्या अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या या महामारीच्या परिस्थितीत भारतासारख्या विकसनशील देशासमोर आरोग्याच्या प्रश्नापेक्षा लोकांच्या जगण्याचा प्रश्न अधिक बिकट झाला आहे. म्हणून प्रस्तूत संशोधन लेखात कोविड १९ मूळे भारतातील असंगटीत क्षेत्रातील कार्यरत लोकसंख्येवर काय आर्थिक परिणाम झाले या बाबत वर्णणात्मक विवेचन प्रस्तूत लेखात करण्यात आले आहे.

**संशोषनाची उद्दिष्टे**

कोविड १९ च्या कारणाने भारतात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जे लॉकडाउन लावण्यात आले व आर्थिक क्रियाना बंधने घालण्यात आले त्याचा भारताच्या असंगटीत क्षेत्रावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधन करण्यात येत आहे. या संशोधनाचे उदिष्ट खालील प्रमाणे आहेत.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

163

१. कोविड १९ च्या मुळे देशात लावण्यात आलेल्या लॉकडाउन मुळे भारतातील असंगठीत क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास करणे.

२. लॉकडाउन च्या नंतरच्या काळात असंगठीत क्षेत्रातील श्रमीकाच्या रोजगार व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

३. देशातील ग्रामिण व शहरी भागातील असंगठीत क्षेत्रातील श्रमिकाच्या रोजगारावरील परिणामाचा आढावा घेणे.

**अभ्यास पध्दती**

प्रस्तुत संशोधन अभ्यास द्वितीयक माहितीच्या आधारावर आधारीत आहे. या करीता शासकीय प्रकाशन, विविध संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्र, ब्लागस, संशोधन पत्रिकेतील लेख इ. मध्ये प्रकाशील माहितीचा आधार घेण्यात आला. प्रस्तुत अभ्यास हे गुणात्मक स्वरूपाचे आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये भारतातील असंगठीत क्षेत्राचा आढावा घेण्यात आला व नंतर लॉकडाउन मुळे देशातील असंगठीत क्षेत्रातील विविध घटकावर झालेल्या परिणामाचे विवेचन करण्यात आले आहे.

**भारतातील असंगठीत क्षेत्र**

देशातील असंगठीत क्षेत्र म्हणजे ज्या क्षेत्रातील श्रमिकाची नोंदणी झालेली नसते व त्यांचा कामाबाबत सेवायोजका सोबत लेखी करार नसतो. जीथे श्रमिकांना पगारी सुट्या, मोफत आरोग्य सुविधा किंवा सामाजिक सुरक्षेची तरतूद नसते अशा क्षेत्राला असंगठीत क्षेत्र असे म्हणतात.

National Commission for Enterprises in the Unorganized Sector (NCEUS) नुसार भारतातील संगठीत क्षेत्राचा विचार करता कृषी क्षेत्रात ९८.५ टक्के श्रमिक हे असंगठीत क्षेत्रात येतात. देशाच्या उद्योग व सेवा क्षेत्रातील क्रमश: ८८ टक्के व ७८ टक्के रोजगार हा असंगठीत क्षेत्रात येतो. म्हणजे देशाचा आर्थिक विकास व वृध्दी, उपजीवीका, मजूरी यांची आर्थिक व्यवहार्यता ही प्रत्यक्षरित्या असंगठीत क्षेत्रावर अवलंबून आहे हे सांगण्याची गरज नाही. देशातील असंगठीत क्षेत्राच्या बाबत लक्षात येते की, शहरी असंगठीत क्षेत्रात कार्यरत लोकसंख्या ही ग्रामिण क्षेत्रातील स्थालांतरीत लोकांना समावून घेते. शिवाय असंगठीत क्षेत्राचे एक महत्वाचे वैशिट्य आहे की, एकूण कार्यकारी महिला लोकसंख्ये पैकी ६० टक्के महिला या क्षेत्रात कार्यरत आहेत.

**भारतातील असंगठीत क्षेत्रावर कोविड १९ चे परिणाम**

जागतिक अधिकोषानुसार २०२०– २१ या वित्तिय वर्षात भारताचा विकास दर ६.१ टक्के भाकित केला होता. परंतू एप्रिल ते जून २०२० या पहिल्या तिमाहीत वास्तविक विकास दर –२३.९ टक्के आहे. Centre for Monitoring Indian Economy (CMIE) नुसार कोरोना मुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामूळे देशातील जवळजवळ १२ कारोड लोकांनी आपले रोजगार गमावला आहे. त्यापैकी असंगठीत क्षेत्रातील ९ करोड या श्रमिक बेरोजगार झाले. यात कारखान्यातील मासिक वेतन धारक १.२ कोटी श्रमिक बेरोजगार झाले, दैनिक मजूरीवर कार्य करणारे श्रमिक, गृहउद्योगातील श्रमिक, स्थालांतरीत श्रमिक तसेच पुरवठा चेन संबंधीत



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

164

अनेक श्रमिक या काळात बेरोजगार झाले. कोरोना काळात विशेषत: सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील मोठया प्रमाणात रोजगार घटले शिवाय या क्षेत्रातील अनेक सुक्ष्म व, लघू उद्योग बंद पडले.

कोरोना लॉकडाउनमूळे या क्षेत्रातील बेरोजगार झालेल्या श्रमिकांना परत लॉकडाउन संपल्यानंतर रोजगार प्राप्त अशक्य झाले. कोरोना मूळे देशातील ९३ टक्के असंगटीत क्षेत्रातील लोकसंख्या कोरोनामूळे गरिबी मध्ये ढकलल्या गेली. असंगठीत क्षेत्रातील सर्व लोक गरिब नाही किंवा सर्वच गरिब असंगठीत क्षेत्रात कार्यरत आहेत असेही नाही परंतू असंगटीत क्षेत्र व गरिबी यात लक्षणिय सहसंबंध दिसून येते. कोरोना लॉकडाउन मूळे हॉटेल्स, निवास व्यवसाय, किरकोळ व थोक व्यवसायीक, व्यापर सेवा, बांधकाम क्षेत्रावर कोरोना माहामारीचा' भयंकर दिसून येत आहेत. या क्षेत्रातील उत्पादन घटले व अनेक श्रमघंटे वाया गेले. कोरोना महामारीच्या लागलेल्या लॉकडाउन मूळे लाखो श्रमिक व त्यांच्या परिवाराला अतिशय कष्टदायक आर्थिक यातना सोसाव्या लागल्या.

**शहरी असंगठीत क्षेत्र**

शहरी असंगटीत क्षेत्रामध्ये वाहतूक, किरकोळ व थोक व्यापारी, बाधकाम क्षेत्र, हॉटेल्स, खानावळ, सुक्ष्म उद्योग, व्यवसायीक सेवा, इ. क्षेत्राचा समावेश होता. कोरोना लॉकडाउनमूळे उद्योग क्षेत्रातील २.८ करोड, व्यापर हॉटेल व खानावळ क्षेत्रातील ३.२ करोड, बाधकाम क्षेत्रातील १.५ करोड, वाहतूक व साठवणूक आणि संचार क्षेत्रातील १.१ करोड आणि वित्त व व्यावसायीक व सेवा क्षेत्रातील ७० लाख श्रमिक या पाच प्रमुख क्षेत्रातील रोजगार गेला. शहरी भागातील असंगटीत क्षेत्रातील ५० टक्के क्षेत्र हे स्वयं व्यवसाय करणारे आहेत तर २० टक्के हे सामान्य व दैनिक मजूरीवर कार्य करणारे आहेत आणि ३० टक्के हे कत्रांटी श्रमिक आहेत. CMIE) नुसार लॉकडाउन मूळे २०२०च्या एप्रिल च्या पहिल्या आठवडयात बेरोजगारी दर हा २३ टक्के होता जो १९३०च्या महामंदीच्या पेक्षाही जास्त होते. या व्यतिरिक्त शहरी क्षेत्रातील फुलाचे व्यापारी, लग्न व समारंभ नियोजक, टॅलर्स, मास विक्रेते, सुरक्षा रक्षक, नाभिक, कलाकार, डेकोरेशन व्यावसायीक, रस्त्यावरील खाद्य पदार्थ विकाणारे, मेकॅनिक, डिलिवरी बॉय, व्यायामशाळा मालक, अशा अनेक क्षेत्रातील लोकांना या लॉकडाउनचा फटका बसला.

कोरोना लॉकडाउन अतिशय कमी कालावधीत जाहीर करण्यात आल्यामूळे अनेक श्रमिक आपल्या कार्यक्षेत्रात अडकले या लॉकडॉउन काळात संचार व इतर निर्बंधामूळे त्यांच्या रोजगार तर गेलाचा उत्पन्न बंद झाले. कोरोनातील आजार, अन्नधान्यसाठी करावा लागलेला आगावू खर्चामूळे परिवारासाठीची बचत सुध्दा संपली, राहण्याची सुविधा नाही अन्नासाठी पैसा नाही व मूलभूत सेवा आभावी अनेकांनी मानसीक तनावातून शेकडो किलोमिटर चालत आपल्या मूळगावी पलायन केले. लॉकडाउन संपल्या नंतर या क्षेत्रातील अनेक व्यवसायीक व उद्योग भांडवलाच्या अभावी व श्रमिकांच्या अभावी सुरू होऊ शकले नाही किंवा अनेकांनी भांडवलाच्या अभावी आपले उद्योग व व्यवसाय बदलविले. सामाजिक सुरक्षेतेच्या अभावी. अनेक श्रमिक शहराकडे रोजगारासाठी परत आले नाही. सरकारने लॉकडाउनच्या चुकीच्या धोरणामूळे अनेकांना आपल्य आर्थिक स्थितीचे उद्भवलेल्या परिस्थितीत समायोजन करता आले नाही. नंतरच्या काळात सरकाने



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

165

अर्थव्यवस्थेला व उद्योगाला आधार देण्यासाठी २२ हजार करोडची मदत जाहीर केली परंतू वास्तविकतेत ती मदत असंगठीत क्षेत्राला अल्पप्रमाणात किंवा नगन्य स्वरूपात प्राप्त झाली. असंगठीत क्षेत्राला संस्थात्मक कर्ज सुविधा उपलब्ध होत नाही त्यामूळे अनेक व्यवसाय बंद पडले व लॉकडाउन नंतर परतणारे श्रमिक यांना आपल्या पूर्वीचे काम प्राप्त होवू शकले नाही.

**ग्रामिण असंगठीत क्षेत्र**

देशातील एकूण असंगटीत क्षेत्रात ग्रामिण असंगटीत क्षेत्राचा वाटा अधिक आहे. शहरी असंगटीत क्षेत्रात १२.१० करोड लोक कार्यरत आहेत तर ग्रामिण असंगटीत क्षेत्रात शहरी क्षेत्रापेक्षा २.५ पट अधिक म्हणजे जवळजवळ २९.८ करोड लोक या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यात ग्रामिण क्षेत्रातील एकूण, असंगटीत क्षेत्रातील श्रमिकांपैकी ६२ टक्के कृषी क्षेत्रात आहेत. त्यामूळे लॉकडाउनचा रोजगार व जीवनयापनाचा जेवढा तिव्र प्रभाव शहरी भागातील असंगटीत क्षेत्रातील दिसून येतो तेवढा तिव्र प्रभाव ग्रामिण भागात दिसून येत नाही. ग्रामिण भागातील बहुतांश शेतकरी हे सिमांत शेतकरी आहेत. म्हणजे त्यांच्या पारिवारीक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची शेती अपूरी आहे. त्यामूळे कोरोना लॉकडाउन मूळे ग्रामिण भागातील लहान शेतकरी यांच्यावर सुध्दा कोरोना परिणाम निश्चितच झाले कारण या काळात त्यांच्या आर्थिक क्रिया थांबलेल्या होत्या. Business Standard Report नुसार ग्रामिण भागातील रोजगार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार गॅरंटी योजना (मनरेगा) जी ग्रामिण भागातील हंगामी बेकारीला उपाय म्हणून अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडते. या योजनेत एप्रिल व महिण्यात केवळ ३.८ करोड ग्रामिण लोकांना रोजगार उपलब्ध करून दिले. तर याचा कालावधीत २०१९ मध्ये २७.३ करोड रोजगार उपलब्ध करून दिला होता.

ग्रामिण भागातील कृषी क्षेत्रातील अनेकांना रोजगार कमी झाले त्यापेक्षा ग्रामिण भागातील गैर कृषीतील रोजगारावर याचा परिणाम झाल्याचे दिसुन येतो. त्यात प्रामुख्याने लहान व्यवसायीक, किरकोळ विक्रेते, फिरते विक्रेते, जत्रा व स्थानिक उत्सवात वस्तू विक्रेते यांच्या रोजगार तसेच जवळच्या शहरात किंवा तालुकास्तरावरील दुकानात किंवा उद्योगात कार्य करणारे श्रमिक यांच्यावर कोरोना लॉकडाउनचा मोटा फटका बसला. लॉकडाउन नंतर काही राज्यात अनेक निर्बंध होते तसेच अनेक राज्यात लॉकडाउन कायम होते. त्यामूळे मार्च २०२० नंतरच्या काळात सुध्दा अगदी २०२१ वर्ष आले तरी सुध्दा ग्रामिण अर्थव्यवस्थेची घडी निट व्यवस्थित बसली नाही अनेक श्रमिक शहरातून परत आपल्या गावाकडे परतल्यामूळे स्थानिक स्तरावर रोजगार मागणीत वाढ झाली

**निष्कर्ष**

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या दृष्टीने असंगटीत क्षेत्राचे महत्व अत्यंत महत्वाचे आहे. किंबहूना भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराचे मुख्य क्षेत्र हे असंगटीत क्षेत्र आहे. कोरोना १९च्या लॉकडाउन मूळे सर्वात जास्त प्रभाव याच क्षेत्रातील लोकांवर झाल्याचे दिसून येते. होटल्स, खानावळ, बांधकाम, सुक्ष्म व लघु उद्योगातील मोठ्या प्रमाणात रोजगार गेले. अनेकाना लॉकडाउन नंतर आपले उद्योग सुरू करण्यासाठी भांडवलाचा अभावामूळे उद्योग बंद पडले. त्यामूळे त्या क्षेत्रातील श्रमिकांच्य रोजगारात मोठी घट झाली केवळ



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

166

या क्षेत्रात कार्यरत श्रमिकांचे रोजगार नाही तर अनेक उद्योग बंद पडल्यामुळे अनेकांच्या आर्थिक स्थिती कमकुवत झाली. किरकोळ व्यापारी व सुक्ष्म उत्पादक यांना अनेक कालावधी साठी त्यांचे उत्पन्न बंद झाले. लॉकडाउन नंतर अनेक व्यवसायातील किंवा क्षेत्रातील आर्थिक क्रिया पुर्ववत होऊ शकल्या नाही. असंघटीत क्षेत्रातील श्रमिकावर घोर गरिबीची स्थिती निर्माण झाली.

संदर्भ

1. Kapil,S.(2020,13th August). COVID-19 lockdown cost 80% informal sector workers their jobs: Survey. Down to Earth. https://www.downtoearth.org.in/news/economy/covid-19- lockdown-cost-80-informal-sector-workers-their-jobs-survey-72812
2. Kavish, P.(2020). Covid-19 lockdown impact: India's unorganised sector faces an uncertain future. https://sabrangindia.in/article/covid-19-lockdown-impact-indias-unorganised-sectorfaces uncertain-futur.
3. Kapoor, R. (2020).Covid-19 and the State of India's Labour Market. ICRIER Policy Paper Series No 18.
4. Khan, F & Mansoor, K.(2020,11th May). COVID-19 impact: Informal economy workers excluded from most govt measures, be it cash transfers or tax benefits. First post. https://www.firstpost.com/business/covid-19-impact-informal-economy-workers-xcludedfrom-most-govt-measures-be-it-cash-transfers-or-tax-benefits-8354051.html
5. Vyas, M.(2020).The Jobs Bloodbath of April 2020.Centre for Monitoring Indian Economy. https://www.cmie.com/kommon/bin/sr.php?kall=warticle&dt=2020-05-05%2008:22:21&msec=776
6. ILO.(2020).ILO Monitor: COVID-19 and the World of Work. second edition. International Labour Office,. https://www.ilo.org/wcmsp5/groups/public/---dgreports/--dcomm/documents/...
7. Verma, A. (2020). Footprints of COVID-19 across the unorganized sector in India.Retrieved from https://blog.ipleaders.in/impact-covid-19-unorganised-sector-india.
8. Mishra, H.H.(2020,29th July). Coronavirus lockdown: How to keep 130 million migrant workers afloat during COVID-19crisis. Business Standard. https://www.businesstoday.in/opinion/columns/coronavirus-lockdown-130-millionmigrant-workers-afloat-covid-19-crisis-unorganised-sector/story/4008



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

167